# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. दगडू आनंदा गारळे ,<br>रा. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दगडू आनंदा गारळे, रा. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे घरगुती विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. २७.८.२००७ रोजी केला व त्याचदिवशी रु.२५/– फी भरली. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ३० दिवसांचे मुदतीत म्हणजे दि. २६.९.२००७ पर्यंत चलन मिळणे आवश्यक होते ते आजतागायत मिळाले नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १.१.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली. त्यानंतर मंचाकडे दिनांक ८.१.२०१० ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि ४.१.२०१० ला आदेश होवूनही चलन देण्यात आले नाही म्हणून प्रस्तुतच्या तक्रारीद्वारे मंचाकडून विलंबापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. मंचाने वितरण कंपनीला नोटीस देवून मुद्देनिहाय अहवाल मागविला परंतु तो दि. २८.१.२०१० पर्यंत अथवा सुनावणीच्या तारखेपर्यंत मिळाला नाही.

सदरच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ९.३.२०१० घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदाराचे प्रतिनिधी व वि.प.चे अधिकारी हजर. वि.प.तर्फे तक्रारदाराचा तक्रार मागे घेत असल्याबद्दलचा अर्ज हजर करण्यात मुदत मिळावी यासाठी ५.४.२०१० पर्यंत मुदत देण्यात आली परंतु अद्यापपर्यंत वि.प.ने अशाप्रकारचा अर्ज दिला नाही किंवा मुद्देनिहाय अहवाल दिला नाही अथवा कनेक्शन दिल्याचेही म्हटले नाही. तक्रारदाराने दि. २७.८.२००७ रोजी प्रोसेसिंग फी रु. २५/– भरल्याचे पावतीची झेरॉक्स व अंतर्गत कक्षाचा ४.१.२०१० चा आदेश तक्रारीसोबत जोडला आहे. वि.प.तर्फे मंचासमोर दि. २०.२.२०१० ला चलन दिल्याचे सांगितले. ही तारीख ग्राह्य धरुन दि. २६.९.२००७ ते २०.२.२०१० या कालावधीतील विलंबासाठी वि.प. तक्रारदार यांस प्रति आठवडा रु. १००/– भरपाई देणेस जबाबदार आहे व तक्रारदारास तो मिळण्याचा हक्क आहे. वि.प.ने विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण न दिल्याने व कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने तक्रारदारास भरपाई देणेस वितरण कंपनी जबाबदार आहे. त्यामुळे तक्रार मंजूर करुन खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६, क्र. ६:१८ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. २६.९.२००७ ते २०.२.२०१० या १२८ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १२,८००/– भरपाई द्यावी.

३) सदर रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये वजा करुन बाकीची रोखीने अथवा चेक/ डिमांड ड्राफ्टने तक्रारदारास देवून त्याची पावती घेण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ६.४.२०१० ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :